10 SEP 2024 तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कौशल्याधिष्ठीत शिक्षणावर भर देण्याची गरज

## कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांचे प्रतिपादन : भौतिकशास्त्र विभागात शिष्यवृत्ती प्रदान

प्रतिनिधी

कोल्हापूर

नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीत शिक्षकांचे योगदान अतिशय महत्वाचे आहे. कौशल्याधिष्ठित शिक्षणावर भर देण्याची गरज आहे, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.

शिवाजी विद्यापीठातील भौतिकशास्त्र अधिविभागात आयोजित शिष्यवृत्ती प्रदान सोहळ्यात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. निवृत्त शिक्षकांच्या स्मृतीप्रित्यर्थ दोन शिष्यवृत्त्या प्रदान करण्यात आल्या.




कोल्हापूर : भौतिकशास्त्र अधिविभागातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत डॉ. के. वाय. राजपुरे, डॉ. आर. जी. सोनकवडे.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शिक्षकांनी विद्यार्थ्यांना फक्त अभ्यासक्रम शिकवण्यापुरते मर्यादित न राहता, त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्नशील राहावे. विद्यार्थी भवनमधील जुन्या आठवणींना उजाळा दिला. सेवानिवृत्त प्राध्यापक एम. बी. डोंगरे यांनी विद्यार्थिनींच्या वसतिगृहाच्या बांधकामासाठी साडे सहा लाख रुपयांची देणगी दिल्याचे सांगून या विभागाला दातृत्वाचा वारसा असल्याचे नमूद केले. डॉ. बी. व्ही. खासबारदार यांनी पुरस्कृत केलेली निवृत्ती शिक्षकाची शिष्यवृत्ती आणि डॉ. सी. एच. भोसले यांनी आपल्या आईच्या स्मृतीप्रित्यर्थ पुरस्कृत केलेली शिष्यवृत्ती सुबहान जमादार, प्रियांका पाटील, संपदा चव्हाण या विद्यार्थ्यांना प्रदान करण्यात आली. माजी विभागप्रमुख डॉ. के. वाय. राजपुरे यांनी मनोगत व्यक्त केले. दोन्ही शिष्यवृत्ती विद्यापीठाच्या 'कमवा आणि शिका' या योजने अंतर्गत येणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आहेत. या योजनेचा उद्देश विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत करून त्यांना स्वावलंबी बनवण्यास प्रोत्साहन देणे हा आहे. अधिविभागप्रमुख डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी गुरू–शिष्य परंपरेचे शाश्वत महत्त्व अधोरेखित केले. गुरू आणि शिष्य यांच्यातील आदरयुक्त बंध शहरी वातावरणापेक्षा ग्रामीण वातावरणात अधिक पाळले जातात. समृद्ध वारसा म्हणून असलेल्या अधिविभागातील सेवानिवृत्त प्राध्यापकांच्या नावांने शिष्यवृत्ती देणे अतिशय महत्वाचे आहे.

उपकुलसचिव बी. एम. नाळे यांनी स्वागत व प्रास्तावित केले. आभार डॉ. एन. एल. तरवाळ यांनी मानले. सूत्रसंचालन नेहा शहा व साक्षी काळे यांनी केले. यावेळी डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. आर. एस. व्हटकर, डी. एच. भादले, डॉ. एम. व्ही. टाकळे, डॉ. एस. पी. दास, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. एस. एस. पाटील, डॉ. एम. आर. वायकर, डॉ. ए. आर. पाटील, उमेश भोसले, अभिजीत लिंग्रस आदी उपस्थित होते.

10 SEP 2024 पुढारी जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर





डॉ. अजिंक्य पत्रावळे प्रा. डॉ. प्रशांत अनभुले डॉ. दत्तात्रय चांदम डॉ. अनिल गोरे प्रा.डॉ. गोविंद कोळेकर प्रा.डॉ. मधुकर देशमुख

# शिवाजी विद्यापीठ, विवेकानंद कॉलेजच्या प्राध्यापकांच्या संशोधनास 'यूके'चे पेटंट

## कर्करोगावरील निदानासाठीची यंत्रणा विकसित करण्याचे ध्येय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ आणि विवेकानंद महाविद्यालयांमधील प्राध्यापकांच्या संशोधनास 'यूके'चे पेटंट मिळाले. भविष्यात सोप्या पद्धतीने प्राथमिक टप्प्यात कर्करोगाच्या निदानासाठीची यंत्रणा विकसित करता आल्यास उपलब्ध असणाऱ्या औषधाचा वापर करून कर्करोगावर नियंत्रण मिळवता येईल, असे संशोधकांना वाटते.

विवेकानंद कॉलेजच्या रसायनशास्त्र विभागातील डॉ. अजिंक्य पत्रावळे व शिवाजी विद्यापीठ रसायनशास्त्र अधिविभागातील प्रा. डॉ. प्रशांत अनभुले, डॉ. गोविंद कोळेकर, वरिष्ठ प्रा. डॉ. मधुकर देशमुख, भोगावती महाविद्यालय येथील डॉ. दत्तात्रय चांदम, ऊका तरसादिया इन्स्टिट्यूट ऑफ केमिकॅल सायन्स-सुरत येथील डॉ. अनिल गोरे यांनी संयुक्त प्रयत्नातून ड्रग लाईक मॉलिक्युल्स याची निर्मिती केली.

किमो उपचारादरम्यान रुग्णांना असह्य वेदना, त्रास होतो. त्यांचे मूळ कारण म्हणजे कर्करोगामुळे प्रभावित पेशी व अप्रभावित पेशीत फरक करता न येणे. याचा विचार करून निवडक प्रकारचे कंपाऊंड बनवणे व फक्त निवडक पेशीवर प्रभावी कार्य करण्याची योजना संशोधकांनी बनवली. त्याचा एक भाग म्हणून हरित पद्धतीचा वापर करत इंडिनो पिरीमिडीन कंपाऊंड बनवून त्यांचे स्तनाच्या कर्करोगावर इन विट्रो पद्धतींनी तपासणी करण्यात आली. प्राथमिक चाचणीत इंडिनो पिरीमिडीन कंपाऊंड स्तनाच्या कर्करोगावरील निवडक पेशीवर अत्यंत प्रभावी पद्धतीने परिणाम करताना दिसून आले. परंतु, नॉर्मल पेशीवर त्यांचा प्रभाव पडताना दिसला नाही. इंडिनो पिरीमिडीन कंपाऊंड हे फक्त स्तनाच्या कर्करोगावरील पेशीवरच प्रभाव करतात का, हे पाहण्यासाठी इतर कॅन्सरवर देखील चाचणी घेण्यात आली. परंतु, अन्य कॅन्सरवर त्यांचा प्रभाव दिसून आला नाही.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

10 SEP 2024
सकाळ

# ‘विद्यापीठ-विवेकानंद’च्या कर्करोगावरील संशोधनाला पेटंट

## सहा संशोधक प्राध्यापकांची यशस्वी कामगिरी


डॉ. अजिंक्य पत्रावळे


प्रा. डॉ. प्रशांत अनभुले


डॉ. दत्तात्रय चांदम


डॉ. अनिल गोरे

कोल्हापूर, ता. ९ : शिवाजी विद्यापीठ आणि विवेकानंद कॉलेजच्या रसायनशास्त्र अधिविभागातील संशोधक प्राध्यापकांनी कॅन्सर (कर्करोग) बाबतच्या ड्रग लाईक मॉलिक्युल्सची निर्मिती केली आहे. त्यांच्या या संयुक्त संशोधनाला युके सरकारचे पेटंट मिळाले.

सहा संशोधकांनी पेटंट मिळविण्याची यशस्वी कामगिरी केली. त्यात विद्यापीठातील प्रा. डॉ. प्रशांत अनभुले, गोविंद कोळेकर, मधुकर देशमुख, विवेकानंद कॉलेजमधील डॉ. अजिंक्य पत्रावळे, भोगावती महाविद्यालयातील डॉ. दत्तात्रय चांदम, सूरत (गुजरात) मधील ऊका तरसादिया इन्स्टिट्यूट ऑफ केमिकल सायन्सचे डॉ. अनिल गोरे यांचा समावेश आहे. सध्या किमोथेरेपीचा वापर करून कर्करोगावर उपचार केले जातात; पण उपचारादरम्यान रुग्णांना असह्य वेदनेचा त्रास सहन करावा लागतो. त्यांचे मूळ कारण म्हणजे कर्करोगामुळे प्रभावित पेशी आणि अप्रभावित पेशीमध्ये फरक करता येत नाही. त्याचा विचार करत अतिशय निवडक प्रकारचे कंपाउंड बनवणे. फक्त कर्करोगावरील निवडक पेशींवर प्रभावी पद्धतीने कार्य करावेत, अशी योजना संशोधकांनी बनवली आहे. संशोधनासाठी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष अभयकुमार साळुंखे, सचिव शुभांगी गावडे, सीईओ कौस्तुभ गावडे, प्राचार्य आर. आर. कुंभार, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य सिद्धार्थ शिंदे यांचे सहकार्य लाभले.

### सर्वसाधारण पेशींवर परिणाम

प्राथमिक चाचणीत इंडिनो पिरीमिडीन कंपाउंड हे ब्रेस्ट कर्करोगावरील निवडक पेशींवर अत्यंत प्रभावी पद्धतीने परिणाम करताना दिसले; परंतु नॉर्मल पेशींवर प्रभाव पडताना दिसत नाही. हे कंपाउंड फक्त ब्रेस्ट कॅन्सरवरील पेशींवरच प्रभाव करतात का? हे पाहण्यासाठी इतर कॅन्सरवरही चाचणी घेतली. मात्र, कोलन कॅन्सर किंवा अन्य कॅन्सरवर त्यांचा प्रभाव दिसला नसल्याची माहिती डॉ. अनभुले यांनी दिली.


प्रा. डॉ. गोविंद कोळेकर


प्रा. डॉ. मधुकर देशमुख

10 SEP 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑनलाईन एमबीए शिक्षण शुल्कात १० टक्के सवलत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रम सुरू करण्यात आला आहे. अधिकार मंडळाने या अभ्यासक्रमास शिक्षण शुल्कामध्ये एकत्रित १० टक्के सवलत देण्यास मान्यता दिली आहे. प्रवेश अर्ज ३० सप्टेंबरपर्यंत मागविले आहेत. अभ्यासक्रमास प्रवेशित आजी-माजी कर्मचारी, त्यांचे पाल्य व पदवीधर विद्यार्थी, महिला, दिव्यांग, तृतीयपंथी, विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांतील शिक्षक वर्ग, विद्यापीठ व महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचारी व त्यांचे पाल्य यांना यातील एक किंवा एकापेक्षा अधिक गटात समावेश असणाऱ्या विद्यार्थ्यास शिक्षण शुल्कामध्ये सवलत दिली आहे. अभ्यासक्रमाची माहिती https:///online.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2024
पुण्यनगरी

# 'एमबीए'च्या शिक्षण शुल्कामध्ये सवलत

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षक केंद्रामार्फत ऑनलाईन एम.बी.ए. अभ्यासक्रम सुरू करण्यात आलेला आहे. या अभ्यासक्रमाचे प्रवेश अर्ज दि. २४ ते दि. ३० या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने मागवण्यात आले. या अभ्यासक्रमास शिक्षण शुल्कामध्ये १० टक्क्यांची सवलत देण्यात आली आहे.



विद्यापीठातील अधिकार मंडळाने अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यापीठातील आजी-माजी कर्मचारी, त्यांचे पाल्य, तसेच शिवाजी विद्यापीठाचे पदवीधर विद्यार्थी, महिला, दिव्यांग, तृतीयपंथी, तसेच विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयांतील शिक्षक वर्ग, विद्यापीठ व महाविद्यालयांतील प्रशासकीय कर्मचारी व त्यांचे पाल्य यांना यातील एक किंवा एकापेक्षा अधिक गटात समावेश असणाऱ्या विद्यार्थ्यास शिक्षण शुल्कामध्ये एकत्रित १० टक्के सवलत देण्यास मान्यता दिली आहे, अशी माहिती विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी पत्रकाद्वारे दिली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2024
सकाळ

# शिवाजी विद्यापीठातील ऑनलाईन 'एमबीए'च्या शुल्कात सवलत

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राने ऑनलाईन एमबीए अभ्यासक्रम सुरू केला आहे. त्याच्या प्रवेशासाठी अर्ज करण्याची मुदत ३० सप्टेंबरपर्यंत आहे. या अभ्यासक्रमाच्या शिक्षण शुल्कामध्ये दहा टक्के सवलत मिळणार आहे. विद्यापीठातील अधिकार मंडळाने या अभ्यासक्रमाला प्रवेशित होणाऱ्या विद्यापीठाचे आजी-माजी कर्मचारी, त्यांचे पाल्य, विद्यापीठाचे पदवीधर विद्यार्थी, महिला, दिव्यांग, तृतीयपंथीय, विद्यापीठ आणि संलग्न महाविद्यालयातील शिक्षक, कर्मचारी आणि त्यांचे पाल्य यांना यातील एक किंवा एकापेक्षा अधिक गटात समावेश असणाऱ्या विद्यार्थ्याला शिक्षण शुल्कामध्ये एकत्रित दहा टक्के सवलत देण्यास मान्यता दिली आहे. त्याचा संबंधितांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2024
तरुण भारत

# ऑनलाईन एमबीएच्या शिक्षण शुल्कात दहा टक्के सवलत

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षक केंद्रामार्फत ऑनलाईन एम. बी. ए. अभ्यासक्रम सुरु आहे. या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ साठी ३० सप्टेंबरपर्यंत ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरण्यास परवानगी आहे. विद्यापीठातील अधिकार मंडळाने या अभ्यासक्रमास प्रवेश घेणाऱ्या विद्यापीठातील आजी, माजी कर्मचारी, त्यांचे पाल्य तसेच शिवाजी विद्यापीठाचे पदवीधर विद्यार्थी महिला, दिव्यांग तृतीयपंथी, विद्यापीठ व संलग्न महाविद्यालयातील शिक्षक, विद्यापीठ व महाविद्यालयातील प्रशासकीय कर्मचारी व त्यांचे पाल्य यांना एमबीएच्या शिक्षण शुल्कामध्ये १० टक्के सवलत देण्यास मान्यता दिली आहे. तरी या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन संधीचा लाभ घ्यावा. या अभ्यासक्रमाबद्दलची माहिती विद्यापीठाच्या https□//online.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2024
पुढारी

# राष्ट्रीय सेवा योजनेमुळे विद्यार्थ्यांच्या विकासाला चालना : डॉ. वनमोरे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी झाल्याने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळते. शिक्षणातून समाजसेवा व समाजसेवेतून शिक्षण हे 'एनएसएस'चे ध्येय आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजनेचे माजी संचालक डॉ. एच. एस. वनमोरे यांनी केले.




विवेकानंद कॉलेजमधील राष्ट्रीय सेवा योजनेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. याप्रसंगी पारस पाटील, रसिका नरके या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. पी. आर. बागडे यांनी स्वागत केले. डॉ. जी. एस. उबाळे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. साक्षी कोळी व ऋतिका पाटील यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. एल. एस. नाकाडी यांनी आभार मानले. यावेळी डॉ. बी. टी. दांगट, प्रा. राजश्री पाटील, प्रा. डॉ. प्रदीप पाटील, प्रा. डॉ. अभिजित पाटील उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
10 SEP 2024
पुढारी

# समाजोपयोगी संशोधन गरजेचे : डॉ. शिरगे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बहुविद्याशाखीय शिक्षणामुळे संशोधनास गती मिळते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी समाजपयोगी संशोधन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन आयआयटी इंदोरचे प्रा. डॉ. पी. एम. शिरगे यांनी केले.




शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागात आयोजित 'ऊर्जेसाठी प्रगत कार्यात्मक पदार्थ' विषयावर व्याख्यानात ते बोलत होते. प्रा. शिरगे यांनी ऊर्जा साठवण, सुपरकंडक्टरमध्ये प्रगत कार्यात्मक पदार्थांचा उपयोग याबद्दल मार्गदर्शन केले.

प्रा. डॉ. आर. जी. सोनकवडे अध्यक्षीय भाषणात म्हणाले, विद्यार्थ्यांनी परिस्थितीचा बाऊ करण्यापेक्षा धाडसी निर्णय घ्यायला शिकले पाहिजे. अपयशाची भीती न बाळगता जागतिक संधी मिळविण्यासाठी आत्मविश्वासाने पुढे यायला हवे. डॉ. के. वाय. राजपुरे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. एस. एस. पाटील यांनी आभार मानले. यावेळी डॉ. ए. व्ही. मोहोळकर, डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. एन. एल. तरवाळ, डॉ. एस. पी. दास, डॉ. व्ही. एस. कुंभार, डॉ. एम. आर. वाईकर, डॉ. ए. आर. पाटील उपस्थित होते.